# विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय (विकास - आस्थापना शाखा)

दालन क्र.११२, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४.

दूरध्वनी व फॅक्स क्र.२७५७१३६९ ई मेल : estkonkan@gmail.com


क्र.विकास/कार्या-४/लेखा-२/यंपरा/ ७७५/२४ दिनांक : २०/०२/२०२४

## दरपत्रक सूचना

विषय : यशवंत पंचायत राज अभियान सन २०२०-२१ व सन २०२२-२३ च्या पुरस्कार वितरण कार्यक्रमासाठी दरपत्रके सादर करणेबाबत.

ग्राम विकास विभागातील मंत्रालय स्तरावरील गुणवंत अधिकारी/कर्मचारी, तसेच क्षेत्रीय स्तरावरील गुणवंत अधिकारी/कर्मचारी/ग्रामसेवक यांना व राज्यातील अतिउत्कृष्ट काम केलेल्या पंचायत राज संस्थांना पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रमाचे आयोजन संबंधित विभाग स्तरावर आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

सदरच्या कार्यक्रमाकरीता आवश्यक असणा-या वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी दरपत्रक सूचना या कार्यालयाच्या सूचना फलक व विभागाच्या http://divcomkonkan.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी इच्छुक पुरवठाधारकांनी खालील तक्त्यात नमूद केलेल्या वस्तू व सेवांसाठी आपली दरपत्रके सिलबंद लिफाफ्यात कार्यालयाच्या वरील पत्त्यावर दिनांक २८/०२/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मा. उप आयुक्त (आस्थापना) यांच्या नावे सादर करावीत. सदर दरपत्रके दिनांक २९/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उप आयुक्त (आस्थापना) यांच्या दालनात पुरवठादार/प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाच्या बाबी |
|---|---|
| १ | निवेदकाचे मानधन |
| २ | बॅक ड्रॉप, वेलकम बॅनर/कार्यक्रमाचा बॅनर |
| ३ | फुले/हार-बुके इत्यादी |
| ४ | डिजीटल व्हीडीओ शुटींग व फोटो |
| ५ | रांगोळी सजावट |

अटी व शर्ती :-

१. दरपत्रके सादर करताना दर सर्व करांसह असावेत. या व्यतिरिक्त अन्य कोणतीही जादा रक्कम अदा केली जाणार नाही.

२. यासोबतच्या तक्त्यात नमूद केलेल्या तपशिलानुसार साहित्य विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, कोकण भवन या ठिकाणी पोहोच करावयाचे आहेत. त्यासाठी एकूण पॅकिंग चार्जेस व कूरीअर चार्जेस दरात समाविष्ट करुन नमूद करावे.

३. काम विहीत मुदतीत पार पाडणे बंधनकारक राहील.

४. साहित्य दरपत्रकानुसार सुस्थितीत प्राप्त झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येईल.

५. देयकांतून नियमाप्रमाणे कर कपात करण्यात येतील.

६. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा, तसेच प्रस्तावित कामाच्या आराखडयात बदल करण्याचे अधिकार मा. उप आयुक्त (आस्थापना), कोकण विभाग यांचेकडे अबाधित राहतील.

सोबत : दरपत्रक नमूने (बाब क्र. १ ते ५)

मा.विभागीय आयुक्त , कोकण यांचे मान्यतेने

(मिनल कुटे)
उपआयुक्त (आस्थापना)
कोकण विभाग

प्रत : १. मा.उपायुक्त (सामान्य शाखा) यांना कोकण विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी सस्नेह अग्रेषित.

२. कार्यालयाचा सूचना फलक.